# ಕರ್ನಾಟಕ ಶಾಲಾ ಪರೀಕ್ಷೆ ಮತ್ತು ಮೌಲ್ಯ ನಿರ್ಣಯ ಮಂಡಲಿ
**ಮಲ್ಲೇಶ್ವರಂ, ಬೆಂಗಳೂರು – 560 003**

**KARNATAKA SCHOOL EXAMINATION AND ASSESSMENT BOARD**
**Malleshwaram, Bengaluru – 560 003**

## 2024-25ರ ಎಸ್.ಎಸ್.ಎಲ್.ಸಿ. ಮಾದರಿ ಪ್ರಶ್ನೆಪತ್ರಿಕೆ-1
## S.S.L.C. MODEL QUESTION PAPER-1 : 2024-25

**ವಿಷಯ : ಪ್ರಥಮ ಭಾಷೆ — ಮರಾಠಿ**
**Subject : First Language — MARATHI**

**ವಿಷಯ ಸಂಕೇತ : 08-M** | **Subject Code : 08-M**

ಸಮಯ : 3 ಗಂಟೆ 15 ನಿಮಿಷಗಳು ] | [ Time : 3 Hours 15 Minutes

ಗರಿಷ್ಠ ಅಂಕಗಳು : **100** ] | [ Max. Marks : **100**

---

**विद्यार्थ्यांना सामान्य सूचना :**

1. प्रश्न पत्रिकेमध्ये एकूण 45 प्रश्न आहेत.
2. प्रश्नांसाठी दिलेल्या सूचनांचे पालन करा.
3. उजव्या बाजूच्या कडेला ( काठावर ) असलेली संख्या पूर्ण गुण दर्शविते.
4. पेपरची उत्तरे सोडविण्यासाठी दिलेला जास्तीत जास्त वेळ प्रश्न पत्रिकेच्या पृष्ठावर वरील भागात दिलेला आहे. त्यामध्ये प्रश्नपत्रिका वाचण्यासाठी 15 मिनिटेही दिलेली आहेत.

[ Turn over

**I. खालील प्रश्नांना प्रत्येकी चार पर्याय दिलेले आहेत. त्यापैकी योग्य पर्याय निवडून उत्तर लिहा :**

**6 × 1 = 6**

1. 'सदाचार' या संधीचा विग्रह असा होतो –

   (अ) स् + आचार (ब) सत् + आचार

   (क) सदा + आचार (ड) सद + आचार

2. 'त. ई. आ.' हे या विभक्तीचे प्रत्यय आहेत –

   (अ) तृतीया (ब) चतुर्थी

   (क) पंचमी (ड) सप्तमी

3. 'रामाने रावणाला मारले' या वाक्यात हा प्रयोग आहे –

   (अ) कर्तरी (ब) कर्मणी

   (क) भावे (ड) यापैकी नाही

4. 'मी अभ्यास केला.' या वाक्यातील काळ ओळखा –

   (अ) भूतकाळ (ब) भविष्यकाळ

   (क) वर्तमानकाळ (ड) साधा भविष्यकाळ

5. 'चोराच्या मनात ...............' म्हण पूर्ण करा.

   (अ) शंका (ब) प्रकाश

   (क) चांदणे (ड) सूर्य

6. 'भाजीभाकर' या शब्दात हा समास आहे –

(अ) अव्ययीभाव समास (ब) तत्पुरुष समास

(क) द्वंद्व समास (ड) बहुव्रीही समास

**II. पहिल्या दोन पदातील संबंध ओळखून तिसऱ्या पदाशी जुळणारा संबंधित शब्द लिहा : 4 × 1 = 4**

7. भाषण ऐकणारा : श्रोता : : भाषण करणारा : ..............

8. नदी : सामान्य नाम : : हिमालय : ..............

9. सफल : विफल : : सुख : ..............

10. जननी : आई : : गगन : ..............

**III. खालील प्रश्नांची एका वाक्यात उत्तरे लिहा : 7 × 1 = 7**

11. वसईमध्ये किती लाखाचा मुलुख होता ?

12. फुल्यांनी नगरहून काय आणले ?

13. पक्षाघात झाल्यावर महात्मा फुले यांनी कोणते पुस्तक लिहिले ?

14. या भारतात नित्य काय वसू दे ?

15. सत्य, न्याय कुठे वसावा असे कविला वाटते ?

16. भुकेलेली पोरे कशी धावतात ?

17. विठ्ठलाला पोरे काय दाखव अशी विनवणी करतात ?

**IV. खालील प्रश्नांची उत्तरे सूचनेप्रमाणे लिहा :** **$3 \times 2 = 6$**

18. वाक्प्रचारांचा अर्थ सांगून वाक्यात उपयोग करा :

(अ) जिव्हारी झोंबणे

(ब) कड दाटणे.

19. अलंकार ओळखून लक्षणे लिहा :

'विद्या ही महासागरासारखी आहे'

20. गण पाडून वृत्त ओळखा.

'विद्याधिकार कुलशील सुरूपताही.'

**V. खालील प्रश्नांची उत्तरे दोन ते तीन वाक्यात लिहा :** **$7 \times 2 = 14$**

21. आंधळ्यांनी हत्तीचे वर्णन कसे केले आहे ?

22. ''तुम्ही त्यांशी कशासाठी भांडता ? तो पुण्यवान आहे'' संदर्भासह स्पष्टीकरण करा.

23. अनंत काणेकर यांचा परिचय लिहा.

24. जपानच्या प्रगतीला कोणत्या दोन गोष्टी कारणीभूत होत्या ?

25. कवी नरेंद्र पंडित यांचा परिचय लिहा.

26. 'हं हळू बोल तनयाते'' संदर्भासहित स्पष्टीकरण करा.

27. तिच्या संसाराला वणवा का म्हंटले आहे ?

**VI. खालीलपैकी कोणत्याही एका कल्पनेचा विस्तार करा : 1 × 3 = 3**

28. (अ) अति तेथे माती

**किंवा**

(ब) प्रयत्नांत्ती परमेश्वर.

**VII. खालील प्रश्नांची उत्तरे पाच–सहा वाक्यात लिहा : 10 × 3 = 30**

29. 'शील' या गुणाबद्दल आंबेडकर काय म्हणतात ?

30. चाफ्याच्या झाडाला लेखक ''बडी माँ'' का म्हणतात ?

31. तिसरी वाटणी कुणी मागितली ? का ?

32. आपला मुलगा पास झाल्याचा आनंद आक्का का व्यक्त करू शकत नव्हती ?

33. हवा असलेला शकुन सांगण्यासाठी कवी कावळ्याला कोणकोणत्या गोष्टी देऊ करतो ? सविस्तर लिहा.

34. धर्माच्या नावाखाली ढोंगी गुरू काय–काय करतो ?

35. पृथ्वीचे प्रेम मिळावे म्हणून कोण–कोण कशाप्रकारे याचना करीत आहेत ?

36. काठी हातात आल्यावर गुराख्याने काय केले ?

37. 'धरण' या कवितेत स्त्रीच्या गरीब परिस्थितीचे वर्णन कसे केले आहे ?

38. बेळगावी काँग्रेसमधील घटनांचे वर्णन करा.

**VIII. खालील प्रश्नांची उत्तरे आठ–दहा वाक्यात लिहा :** **4 × 4 = 16**

39. लेखकाने काकूंना कायमचा रामराम का ठोकला ? सविस्तर लिहा.

40. डॉक्टरांनी शिबिरामध्ये कोणकोणत्त्या गोष्टींची माहिति दिली ?

**किंवा**

या शिबिराचा अदृश्य परिणाम काय झाला ? ते सविस्तर लिहा.

41. 'सत्कार' या कवितेचा सारांश तुमच्या शब्दात थोडक्यात लिहा.

**किंवा**

हिरव्या तृणपात्याचा सत्कार कुणी व का केला ?

42. खालील कवितेच्या ओळी पूर्ण करा :

कोंदला आंधार ...............................

...............................................

...............................................

............................... ज्यांनी जीविती

**किंवा**

नेटके काही .................................

...............................................

...............................................

............................... तयांची आरती.

**IX. खाली दिलेला उतारा वाचून त्या खाली दिलेल्या प्रश्नांची उत्तरे लिहा : 1 × 4 = 4**

43. जन्मभर आपण वृक्षांच्या आधारे जगतो आणि मृत्यूनंतरही एक वृक्ष आपण घेऊन जात्तो. तेंव्हा जन्मापासून मरणानंतरही साथ देणाऱ्या या वृक्षांची आपण जाण ठेवली पाहिजे. यासाठी प्रत्येक व्यक्तिने आपल्या आयुष्यात निदान दोन–चार तरी झाडे लावून ती मोठी करण्याचे सत्कार्य केले पाहिजे. त्यामुळे पर्यावरणाचे संरक्षण होणार आहे.

**प्रश्न** :

(अ) व्यक्तिने वृक्षाची जाण कशी ठेवली पाहिजे ? 2

(ब) आपण पर्यावरणाचे संरक्षण कसे करू शकतो ? 2

**X. खालीलपैकी कोणत्याही एका विषयावर पत्रलेखन करा : 1 × 5 = 5**

44. तुमच्या अभ्यास कसा चालला आहे ते तुमच्या मित्रास / मैत्रिणीस पत्राद्वारे कळवा.

**किंवा**

एस. एस. एल. सी. पास झाल्याचा दाखला मिळण्यासाठी मुख्याध्यापकांना अर्ज लिहा.

**XI. खालीलपैकी कोणत्याही एका विषयावर पंधरा ते वीस ओळी निबंध लिहा : 1 × 5 = 5**

45. (अ) संगणक काळाची गरज

(ब) आपले राष्ट्रीय सण.